नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ११/०९/२०२६ (शुक्रवार )

.....................................................................................

## धोकादायक वाहन पार्किंग विरोधात नागपूर ग्रामीण पोलीसांची विशेष मोहीम; सावनेर उपविभागात ७६ गुन्हे दाखल

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच श्री. सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली अपघातांना आळा घालण्यासाठी सावनेर उपविभागात धोकादायक वाहन पार्किंगविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली.

हॉटेल, ढाबे, गोडाऊन व कंपन्यांसमोरील बेशिस्त पार्किंगमुळे तसेच रस्त्यांवर धोकादायक पद्धतीने वाहने उभी केल्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढत असल्याने, अपघात प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून सावनेर उपविभागात दिनांक ०९/०९/२०२६ आणि १०/०९/२०२६ रोजी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान ज्या हॉटेल मालक, गोडाऊन मालक, ढाबा मालक तसेच कंपनी मालकांनी त्यांच्या आस्थापनांसमोर सार्वजनिक रस्त्यावर वाहने धोकादायकरित्या उभी करू दिली त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम २८५, ४९ अन्वये तसेच राज्यमार्ग व महामार्गालगत धोकादायक स्थितीत वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये पोलीस स्टेशन सावनेर अतंर्गत –०९ गुन्हे, कळमेश्वर अतंर्गत – ३८ गुन्हे, केळवद अतंर्गत – १० गुन्हे, खापा अतंर्गत – ०९ गुन्हे, मोहपा अतंर्गत – १० गुन्हे असे एकूण ७६ गुन्हे नोंदविण्यात आले. याशिवाय सार्वजनिक ठिकाणी धोकादायक स्थितीत वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कलम १२२ मोवाका अन्वये दंडात्मक कारवाई

**करण्यात आली. या विशेष मोहिमेत कलम १२२ मोवाका अन्वये सावनेर येथे १२, कळमेश्वर येथे ०३ आणि खापा येथे ०१ अशा एकुण १६ कारवाई करण्यात आल्या आहे.**

**रस्त्यालगत बेशिस्त व धोकादायक पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघातांची शक्यता वाढते. त्यामुळे नागपूर ग्रामीण पोलीसांकडून अपघात प्रतिबंध आणि सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीने अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार आहेत.हॉटेल, ढाबे, गोडाऊन, कंपन्या व इतर आस्थापनांच्या मालकांनी आपल्या आस्थापनांसमोर सार्वजनिक रस्त्यावर वाहने उभी करू देवु नये तसेच ग्राहकासाठी योग्य पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून दयावी जेणेकरून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. असे नागपूर ग्रामीण पोलिसांकडून आवाहन करण्यात आले.**

## नागपुर शहरात गोळीबार करून पळुन गेलेल्या ३ संशयीत आरोपींचा बुटीबोरी पोलीसांनी शिताफिने पाठलाग करून घेतला ताबा

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड (प्रभार नागपुर उपविभाग) यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुटीबोरी यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री किशोर भुजाडे आणि पथकाने दिनांक ११/०९/२०२६ रोजी नागपूर शहरातील बेलतरोडी पोलीस स्टेशन हद्दीत गोळीबार करून पांढऱ्या रंगाच्या डस्टर कारमधून पसार झालेल्या संशयितांचा तातडीने शोध घेवुन ताबा घेतला.**

दिनांक ११/०९/२०२६ रोजी रात्री ०१:३० वाजता बुटीबोरी पोलीसांना नागपुर शहर गुन्हे शाखा यांच्या कडुन माहीती प्राप्त झाली की, नागपूर शहरातील बेलतरोडी पोलीस स्टेशन हद्दीत गोळीबार करून नमुद आरोपी हे पांढऱ्या रंगाच्या डस्टर कारमधून बुटीबोरी च्या दिशेने पळुन गेले आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे बुटीबोरी पोलीसांनी वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात तातडीने नाकाबंदी केली तसेच सदर वाहनाचा शोध घेणे कामी सतर्क पेट्रोलींग केली असता नमुद वर्णनाचे वाहन सातगावकडे जाताना दिसले. नमुद वाहनचा शिताफिने पाठलाग करून पोलीसांनी सातगाव येथील मुळक कॉलेजच्या मागे नमुद

डस्टर वाहन  थांबवून त्यातील तीन संशयितांना ताब्यात घेतले. **१) सुनिल पांडुरंग बानाईत, वय ४८ वर्षे, रा. गोठाळ पांजरी, नागपूर, २)सुलम संजय दिवेकर, वय २१ वर्षे, रा. वकीलपेठ, क्रीडा चौक, नागपूर ३) निकेश नरेश टेभुर्णे, वय ३७ वर्षे, रा. मानेवाडा, नागपूर** यांना ताब्यात घेवुन पुढील कायदेशीर कारवाईसाठी नागपूर शहर गुन्हे शाखेच्या ताब्यात दिले.

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ११/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन केळवद च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली.**

**श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या उपस्थितीत सहा पोलीस निरीक्षक श्री आशिषसिंह ठाकुर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद यांच्यासह केळवद पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी केळवद शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**






देशाचे
नं.1
सिमेंट

## अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री विरोधात कळमेश्वर पोलीसांची विशेष मोहीम, १० गुन्हे नोंद
## गौंडखैरी पारधी बेडा येथे कारवाई करत ५ लाख ७३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १०/०९/२०२६ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या नेतृत्वात ,पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी कळमेश्वर पोलीस, दंगानियंत्रण पथक,होमगार्ड यांच्यासह गौंडखैरी पारधी बेडा येथे कारवाई करत. अवैध दारू निर्मिती आणि विक्री करणारे आरोपी यांचेवर कारवाई केली.

दिनांक १०/०९/२०२६ रोजी मौजा गौंडखैरी पारधी बेडा येथे १० महीला आरोपींवर कारवाई करत घटनास्थळावरील हातभट्टया नष्ट करून पोलीसांनी पंचासमक्ष ४६० लिटर गावठी दारू, २२,००० लिटर मोहफुल सडवा तसेच इतर साहित्य असा एकूण ५,७३,०००/— किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १० गुन्हे नोंदविण्यात आले आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.


WORKS


WORKS



## नागपूर ग्रामीण पोलीसांची अवैध दारूविरोधात विशेष मोहीम; ४३ गुन्हे दाखल, १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १०/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याच्या अनुषंगाने दिनांक १०/०९/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण पोलिसांनी जिल्हाभर विशेष मोहीम राबवून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ४३ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ०३ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत ०५** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत ०१** गुन्हा नोंद,**पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत ०५** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव**

**अंतर्गत** ०४ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत १०** गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत** ०१ गुन्हा नोंद . **पोलीस स्टेशन बेला अंतर्गत** ०४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत ०४** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण २९२५० मिली देशी दारू, ८८१ लिटर मोहाफुल दारू, ३२५०० लिटर मोहाफुल रसायन सडवा व ईतर साहित्य असा एकुण १४,००,९७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. १ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ११/०९/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना रात्रगस्ती दरम्यान गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा विवेकानंद नगर, हनुमान मंदीराच्या मागे मोकळ्या जागेत सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) रोशन उर्फ सोनू रामू यादव, वय ३६ वर्षे, रा. स्टेशन रोड, गवळीपुरा, कन्हान. २) चंकी राजेंद्र सहारे, वय २९ वर्षे, रा. विवेकानंद नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर. ३) अजय भाऊराव पडघणे, वय ३९ वर्षे, रा. पटेल नगर, पिपरी, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.४) विक्की पंजावर कोमटे, वय ३१ वर्षे, रा. शिव नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.५) आकाश गजानन जाधव, वय २८ वर्षे, रा. विवेकानंद नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.६) सौरभ पंजाबवर वासे, वय २७ वर्षे, रा. हनुमान नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.७) नितेश मुन्नालाल राठोड, वय ३० वर्षे, रा. विवेकानंद नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.८) सुधाकर अनवरसिंग खडसे, वय ४८ वर्षे, रा. विवेकानंद नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.९) प्रिंस देवशरण करश्यप, वय १९ वर्षे, रा. खदान नं. ३, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.१०) हर्ष उमाकांत निशाद, वय १९ वर्षे, रा. खदान नं. ३, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.११) विशाल सुरज मेहता, वय ३३ वर्षे, रा. राय नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.१२) सचिन भिवाजी मारबते, वय ४५ वर्षे, रा. विवेकानंद नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.१३) विनोद रामभाऊ चामट, वय ४५ वर्षे, रा. विवेकानंद नगर, कन्हान, ता.**

**पारशिवनी, जि. नागपूर.१४) आदित्य अनिल भरणे, वय ३४ वर्षे, रा. राय नगर, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर.१५) संजय भुवन मुरचुडे, वय ४२ वर्षे. रा खदान क्र ३ कन्हान, ता पारशिवनी जि नागपुर** हे जागीच जुगार खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचाासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ३७,०००/—रुपये, ८ मोबाईल किंमती ९८,०००/—रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण १,३५,०५०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ अ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

## अवैध जुगाराविरोधात नागपूर ग्रामीण पोलिसांची विशेष मोहीम; ६१ आरोपींवर १३ गुन्हे दाखल

## ५२ ताशपत्ते, ९ मोबाईल व ६ दुचाकींसह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या तसेच जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने दिनांक १०/०९/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण पोलिसांनी जिल्हाभर विशेष मोहीम राबविली. या विशेष मोहिमेदरम्यान विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या ६१ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकूण १३ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन भिवापुर** येथे ३ आरोपीविरूध्द १ गुन्हा आणि ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **२ गुन्हे नोंद** करण्यात आले आहे. **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे ३ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा नोंद** आहे. **पोलीस स्टेशन मौदा** येथे ४ आरोपीविरूध्द १ गुन्हा, ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा आणि ४ आरोपीविरूध्द १ गुन्हा,नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **३ गुन्हे** नोंद करण्यात आले आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ८ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन मोहपा** येथे २ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे ६ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ४ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ४ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे ३ आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा

जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन अरोली** येथे १० आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे.

**वर प्रमाणे ६१ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ५२ ताशपत्ते,९ मोबाईल, ६ दुचाकी वाहनांसह एकुण एकुण ६,००,४४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपुर ग्रामीण जिल्हा**